## जाहीर नोटीस (१)

सर्व संबधीतांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून विकास हक्काच्या (डी.आर.) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र , गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी ,लीज, लीन, चार्ज , इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हिंतसंबध असल्यास संबधितांने प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे - ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमीनीचा मोबदला डी.आर. च्या स्वरुपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरीचिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे च-होली येथील स.नं ४६३।२ पै. (जुना स.नं.५१९पै.) मधील श्री. विजयराव ज्ञानेश्वर तापकीर व सौ.निर्मला ज्ञानेश्वर तापकीर यांच्यातर्फे मे.पार्श्व प्रापर्टीज तर्फे भागिदार श्री.सचिन अशोक सिरोया व श्री. परेश देवचंद ओसवाल यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी. व ४५.०० मी. रस्ता या प्रस्तावाने बाधित क्षेत्र २०६३.९२ चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा- (मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी. व ४५.०० मी. रस्ता- २०६३.९२ चौ. मी. क्षेत्र)

| | |
|---|---|
| उत्तरेस :- | उत्तर – लागू रस्ता |
| दक्षिणेसः- | दक्षिण-स.नं. ४६३ पैकीची अर्जदाराची उर्वरीत मिळकत |
| पुर्वेस :- | पुर्व- स.नं. ४६३ पैकीची उर्वरीत मिळकत |
| पश्चिमेस :- | पश्चिम-स.नं. ४६३ पैकीची उर्वरीत मिळकत |

परिशिष्ट -२) मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मौजे रावेत येथील स.नं. ६४/२/१ पैकी मधील श्री. प्रकाश,सतिश,भिमाजी व विठ्ठल बळवंत काटे व इतर तर्फे कुलमुखत्यारपत्रधारक मे. रॉयल इमिनन्स चे भागीदार श्री. योगेश ज्ञानेश्वर चिंचवडे, श्री. निलेश नारायणभाई पटेल यांचे मिळकतीमधील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्ता या प्रस्तावाने बाधित होणारे एकुण क्षेत्र १८७.०१ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -
मौजे रावेत येथील स.नं. ६४/२/१ पैकी मधील १८७.०१ चौ.मी. ची चतु:सिमा :

उत्तरेस :- स.नं. ६४ पैकी मिळकत
पुर्वेस :- स.नं. ६४ पैकी अर्जदार यांची उर्वरित मिळकत
दक्षिणेस :- स.नं. ६४ पैकी मिळकत
पश्चिमेस :- लागू किवळे गावची शिव (महानगरपालिका ताब्यातील क्षेत्र)

परिशिष्ट -३) मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे दिघी येथील स.नं. ७९ पै .मधील मे. शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघ संचालक श्री सर्जेराव शिवराम पाटील यांचे तर्फे कुलमुखत्यारपत्रधारक मे.व्ही.स्क्वेअर प्रॉपर्टीज एल.एल.पी तर्फे श्री प्रसाद विठ्ठलराव पवार व श्रीम.विद्या प्रसाद पवार यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील ६०.०० मी. रस्तारुंदीने बाधित क्षेत्र ४६८.०० चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे–

चतु:सिमा- :

मौजे दिघी येथील स.नं. ७९ पै.मधील ६०.०० मी. रस्तारुंदीकरण क्षेत्राची चतु:सिमा(बाधित क्षेत्र– ४६८.०० चौ.मी. )

पुर्वेस- लागू रस्ता
पश्चिमेस- लागु स.नं ७९ पै अर्जदाराची उर्वरित मिळकत
दक्षिणेस- लागु स.नं ७९ पै उर्वरित मिळकत
उत्तरेस - लागु स.नं ७९ पै उर्वरित मिळकत

जाहीर नोटीस (२)

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये नमूद केलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवासा सदर मिळकतीच्या हितसंबंधितांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजेमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे- ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल, व जमीन महापालिका ताब्यात घेतील. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दातील मौजे रहाटणी येथील स.नं. ३७/३/४ पैकी सि.स.नं. १६१३ पैकी सौ. बसम्मा संतोष विटकर यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रातील १२.०० मी. रूंद रस्त्याचे बाधित अंदाजे क्षेत्र ११६.०२ चौ.मी जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमाः-

पूर्वेस- स. नं. ३८ सि.स.नं. १६१४ पैकी मिळकत

पश्चिमेस – अर्जदार यांची उर्वरित मिळकत

दक्षिणेस- स. नं. ३७ पैकी सि.स.नं. १६१३ पैकी मिळकत

उत्तेरस- स. नं. ३७ पैकी सि.स.नं. १६१३ पैकी मिळकत

## जाहीर नोटीस (३)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे दापोडी येथील स.नं. १८/०१ सि.स.नं. १८४५ पैकी मधील श्री. सतीश बसंवत पाटील यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील १२ मी.रस्त्याने बाधित क्षेत्र ३१३.३२ चौ.मी व आ. क्र. ०३/०७ प्राथमिक शाळेने बाधित २८.८७ चौ.मी. असे एकूण ३४२.१९ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा-

मौजे दापोडी येथील स.नं. १८/०१ सि.स.नं. १८४५ पैकी मधील १२ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र ३१३. ३२ चौ.मी. व आ.क्र. ०३/०७ प्राथमिक शाळेने बाधित २८.८७ चौ.मी. असे एकूण ३४२.१९ चौ.मी. चतु:सिमा (बाधित क्षेत्र - ३४२.१९ चौ.मी. )

चतु:सिमा-
पुर्वेस :- लागू सि.स.नं. १८४६ पैकीची मिळकत
पश्चिमेस :- लागू सि.स.नं. १८४४ पैकीची मिळकत
दक्षिणेस:- लागू रस्ता
उत्तरेस :- लागू सि.स.नं. १८६६ पैकीची मिळकत

परिशिष्ट २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चऱ्होली येथील स.नं. १०९/२/२ पै मधील **श्री. पंडित राघु रासकर** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी. व ९०.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र १४६५.०० चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

मौजे च-होली स.नं. १०९/२/२ पै मधील मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी. व ९०.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र १४६५.०० चौ.मी.

चतु:सिमा-

| | स.नं. १०९/२/२ पै |
|---|---|
| उत्तरेस | स.नं.१०९ पैकीची मिळकत |
| दक्षिणेस | स.नं.१०९ पैकीची मिळकत |
| पुर्वेस | स.नं.१०९ पैकीची मिळकत |
| पश्चिमेस | लागू स.नं. ११५ पैकीची मिळकत |

परिशिष्ट ३) मिळकतीचे वर्णन– तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे रहाटणी येथील स.नं. १८।११।६ पैकी, सि.स.नं. ११०६ पैकी श्री. माऊली गुलाब कोकणे यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजुर विकास योजनेतील तथापी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली समाविष्ट करणेत आलेल्या भागातील ४५.० मी.रुंद रस्त्याने बाधित अंदाजे क्षेत्र ९३९.५० चौ.मी. जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमा

मौजे रहाटणी येथील स.नं. १८।११।६ पैकी, सि.स.नं. ११०६ पैकी ४५.० मी.रुंद रस्त्याने बाधित अंदाजे क्षेत्र ९३९.५० चौ.मी.

पूर्व - स.नं. १८ पैकी, सि.स.नं. ११०६ पैकी मिळकत

पश्चिम - स.नं. १८ पैकी, सि.स.नं. ११०६ पैकी मिळकत

उत्तर - स.नं. १८ पैकी, सि.स.नं. ११०६ पैकी अर्जदार यांची उर्वरीत मिळकत

दक्षिण - लागू रस्ता

(राजेंद्र पवार)
उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

जाहिरात क्रमांक 353
दिनांक 9/7/19